# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

## (दुपार)

जा.क्र. ८२० / माहिती कक्ष / वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १९/१२/२०१७

**१) संगनमत करुन झोपडीला आग लावुन जाळपोळ केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १८/१२/२०१७ चे ०४.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी सौ. सुत्रधारा रामलाल बुंदेले वय ६८ वर्ष, रा. कन्हाळमोह हिचे कन्हाळमोह गाव ठाण येथे सरकारी पडीत जागेत असलेल्या झोपडीचे जागेवरुन यातील संशयीत आरोपीतांन सोबत वाद आहे? संशयीत आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीचे झोपडीला आग लावुन झोपडी जाळुन अंदाजे ५,०००/–रु. चे नुकसान केल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ४३६,३४ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास मपोउपनी. लांडे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**२) मोटार सायकलच्या धडकेत दोन जखमी . :–**

दिनांक १८/१२/२०१७ चे १२.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी राजेन्द्र अमृत झिंगरे वय २५ वर्ष, रा. कोकणाटोला जिल्हा गोंदिया यांचा मित्र ललीत सुखदेव रा. सानगडी व अतुल लांजेवार रा. कोकनाटोला हे त्यांचे बिना नंबरची हिरो ग्ल्यामर कंपनीची मोटार सायकल ने साकोली कडुन एकोडी कडे जातांना परसटोला गावा कडुन येणाऱ्या आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे मोटार सायकलला धडक मारुन फिर्यादींचे मित्रांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३७ भांदवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गोंडाणे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**२) अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १८/१२/२०१७ चे २१.१५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही चालनीज दुकानात हजर असतांना यातील आरोपीतांनी तिचे दुकानात जावुन चायनीज आहे काय? असे विचारुन फिर्यादीने चायनीज संपले असे म्हटले असता यातील आरोपी हे दारु पिवुन दारुचे नशेत भांडण करुन फिर्यादीस अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन तिचे पतीला ढकलढुकल करुन बुक्कींने मारहान करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम २९४,३२३,५०४,५०६,३४ भांदवी. सहकलम ८५(१) मदाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिन्हेपुंजे पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

**३) गळफास लावुन तरुणाचा मृत्यु . :–**

दिनांक १७/१२/२०१७ चे ०८.०० दिनांक १८/१२/२०१७ चे ०८.०० वाजता दरम्यान यातील मृतक चेतन वनवास सिंधी मेश्राम वय २८ वर्ष, रा. मांगली हा नागपुर येथे कामानिमीत्त जातो असे सांगुन घराचे धाब्यावर छताला असलेल्या लाकडी मयाऱ्ीला नायलॉन दोरीने स्वत: गळफास लावुन मरण पावल्याने फिर्यादी वनवास उर्फ लहानु सिंधी मेश्राम वय ५५ वर्ष, रा. मांगली यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे. पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. चुटे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**४) इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक १७/१२/२०१७ चे १४.१५ वाजता दरम्यान यातील मृतक सतीश जयदेव बन्सोड वय ३४ वर्ष, रा. आंबेडकर वार्ड तुमसर यांचे छातीत दुखत असल्याने त्यास औषधोपचाराकरीता डॉक्टर बुधे दवाखाना तुमसर येथे दाखल केले असता तेथिल डॉ. ने त्यास पुढील उपचारा करीता भंडारा येथे रेफर केल्याने त्यास सा. रु. भंडारा येथे नेले असता तेथिल डॉक्टरनी तपासुन मृत घोषीत केल्याने पोस्टे भंडारा येथे ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. तांडेकर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. तुमसर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. शहारे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**५) तलावाचे पाण्यात बुडुन महिलेचा मृत्यु . :—**

दिनांक १६/१२/२०१७ ते १८/१२/२०१७ चे १८.३० यातील मृतक श्रीमती कौशल्याबई मारोती वाढई वय ७५ वर्ष, रा. किन्ही एकोडी ही वेळसर पनाचे भरात घरी कोणाला काही न सांगता कोठेही निघुन जाण्याच्या सवईची होती? मृतक ही वेळसर पनाचे भरात तलावाचे पाण्यात बुडुन मरण पावल्याने तिचे मरणास कोणावरही संशय नाही असे फिर्यादी रामचंद्र दिंगाबर पेटकुले वय २१ वर्ष, रा. किन्ही यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे. लाखनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. टेभुर्णीकर पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**६) इसमाचा मृत्यु . :—**

दिनांक १८/१२/२०१७ चे ०६.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी साजन गंगाधर देशभ्रतार वय २७ वर्ष, रा. नेहरु वार्ड वरठी हा नेहरु वार्ड वरठी स्वत:चे रुम कडे गेला असता त्यास एक मृतक हरीहर तेजराम धकाते वय ५० वर्ष, रा. इंदीरा गांधी वार्ड भंडारा हा कसा काय मरण पावला याबाबत माहीती नाही अश्या फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे. वरठी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कुंभलवार पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक १८/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी – ०४, तीन सिटर वाहनांवरती– १८ केसेस व ईतर वाहनांवरती –८६ केसेस करण्यात आलेले आहे.

19.12

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.